**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती ग्रामीण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0417 **P.S.(ठाणे):** धारणी

**Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/07/2025 01:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Date From (दिनांक पासून):** 10/07/2025
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 10/07/2025
   **Time From (वेळेपासून):** 15:45 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 11/07/2025 **Time (वेळ):** 01:29 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 003
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/07/2025 01:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समीती कार्यालय,धारणी ता, ता धारणी जि अमरावती

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री.प्रविण श्रीराम सदाफळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1990

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | दुनी ताधारणी जिअमरावती,धारणी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | दुनी ताधारणी जिअमरावती,धारणी,अमरावती ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9326443012

**Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पंकज रमेशराव निंघोट | | | 1. धनई नगर, सुरेश धुर्वे याचे घर, शेंदोडा खुर्द, ता तिवसा, जि , धारणी,अमरावती ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

**Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

**Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



पोलीस स्टेशन धारणी जि. अमरावती (ग्रा.)

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्याद शासकीय विश्रामगृह धारणी दिनांकः 10/07/2025.माझे नाव - श्री.प्रविण श्रीराम सदाफळे, वय-35वर्ष, व्यवसाय खाजगी नौकरी,(कौशल सोलर,प्रा.लि परतवाडा.) रा.मु.पो.दुनी ता.धारणी जि.अमरावती मो.क्र.9326443012.मी समक्ष अॅन्टी करप्शन कार्यालय, अमरावती येथे हजर राहुन लेखी तक्रार देतो की, मी वरील पत्यावर आईवडीलासह राहतो.सन 2025 मध्ये माझे नावे ग्राम दुनी येथे रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल मंजूर झाले आहे. घरकूल बांधकामासाठी आतापर्यन्त मला दोन किस्त असे 60,000/-रुपये भेटले आहे. दि.07.07.2025 रोजी मी पंचायत समिती धारणी येथे माझे घराचे तिसरा हप्त्याबाबत विचारणा करीता गेलो असता, मला त्याठिकाणी आर.एच.ई साहेब श्री.पंकज निघोंट हे भेटले मी त्यांना माझे घरकूल चा तिसरा हप्त्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगीतीले की, सचिव यांची सही असलेला प्रमाणपत्र व ग्रामपंचायत मधील एक सदस्य यांचा फोटो असे प्रमाणपत्र व फोटो घेवून या, आणि 15,000/- रुपये आणा तरच तुम्हाला तिसरा हप्ता तुमच्या बँक खात्यात टाकतो, असे म्हटले त्यावेळी मी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे सर असे म्हणून त्याठिकाणाहून निघून आलो.पंचायत समिती धारणी येथील आर.एच.ई श्री.पंकज निघोंट साहेब मला माझे घरकूल चा तिसरा हप्ताची रक्कम माझे बँक खात्यात टाकण्यासाठी 15,000/- लाचेची मागणी करीत असून मला त्यांना लाच देण्याची मुळीच ईच्छा नाही. त्यांचेवर योग्य कार्यवाहीकरीता आपणाकडे तक्रार देत आहो.पंचायत समिती धारणी येथील आर.एच.ई श्री.पंकज निघोंट यांचेसोबत माझे कोणत्याही प्रकारचे वाद नसुन कोणतेही आर्थीक व्यवहार नाही.तरी त्यांच्यावर कायदेषिर कार्यवाही होण्यास विनंती आहे.अशा आशयाची लेखी तक्रार मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती येथे दिनांक 09/07/2025 रोजी प्रत्यक्ष येवुन दिली होती.तेथे उपस्थित असलेल्या पो.नि.सुजाता बन्सोड यांनी स्वतःचा व स्टाफचा परीचय करुन दिला व माझी तक्रार घेवुन वनविभाग अमरावती येथील दोन कर्मचारी शासकीय पंच म्हणुन बोलावुन घेतले.त्यानंतर मला पंचाची ओळख करुन दिली. तसेच पंचाना माझी व स्टाफची ओळख करुन दिली. त्यानंतर मी सांगितलेली तोंडी व लेखी तक्रार एकच असल्याची पंचांनी खात्री करुन पंचानी त्यावर सहया केल्या. त्यांनतर पो.नि सुजाता बन्सोड यांनी पंच क्र. 1 श्री.सुभाश मारोतीराव जाधव व पंच क्र 2 श्री.खुषाल साहेबराव पुनसे यांचे समक्ष पडताळणी पुर्व पंचनामा करुन मला व पंचाना आवष्यक त्या सुचना दिल्या.तसेच व्हॉईस रेकॉर्डर व मेमरीकार्ड बाबत माहीती देवुन " मला श्री.पंकज निंघोट ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी),पंचायत समीती धारणी, ता. धारणी, जि. अमरावती यांची लाचेची मागणी आहे किंवा कसे" याबाबत पडताळणी कार्यवाही करणे असल्याने इलोसे यांची भेट कधी व कोठे होईल याबाबात पो.नि. बन्सोड मॅडम यांनी मला विचारणा केली असता मी सांगितले की,इलोकसेवक श्री.पंकज निंघोट यांची दिनांक 10/07/2025 रोजी त्यांच्या कार्यालयात भेट होवु षकते असे सांगीतले त्यामुळे पो.नि. बन्सोड मॅडम यांनी मला निघुन जाण्यास सांगण्यात आले व सापळा पथक हे दिनांक 10/07/2025 रोजी पडताळणी कार्यवाही करीता धारणी येथे येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यांनतर दिनांक 10/07/2025 रोजी सकाळी मला पो.नि.बन्सोड यांनी फोनव्दारे माहीती दिली की, संपुर्ण सापळा पथक व पंच हे षासकीय वाहनाने पडताळणी कार्यवाही करण्याकरीता धारणी येथे येणे कामी अमरावती वरुन रवाना झाले आहे. त्यावरुन मी त्यांना सांगितले की, मॅडम मी खाजगी कामानिमीत्त्य परतवाडा येथेच आहे तर मी परतवाडा येथेच थांबतो व आपण सोबत निघु त्यावरुन सापळा पथक हे परतवाडा येथे आले व आम्ही सर्वजण धारणी जाण्याकरीता दोन षासकीय वाहनाने निघालो. आम्ही सर्वजन दोन षासकीय वाहनाने एका निर्जन स्थळी ,गोटा फाटा येथे अंदाजे 12.45 वा. पोहचलो तेथे पो.नि. बन्सोड यांनी पडताळणी पुर्व पंचनाम्याच्या सुचनांची उजळणी करुन पंच क्रमांक 1 श्री. सुभाश मारोतीराव जाधव यांना माझे सोबत पाठविण्यात येईल व पंच क्रमांक 2 श्री.खुषाल साहेबराव पुनसे यांना सापळा पथकासोबत थांबावे लागेल असे सांगीतले. व पंकज निंघोट हे कुठे भेटतील याबाबत मला शहानिशा करण्याकरीता मॅडम यांनी कॉल करण्यास सांगितल्या वरुन मी पंकज निंघोट यांना कॉल केला असता त्यांनी मला सांगितले की, मी तुझ्या घरी दुनी येथे एका



पोलीस स्टेशन धारणी जि.अमरावती (ग्रा.) सत्यमेव जयते

तासात येतोच असे सांगितले त्यावरुन सापळा पथक पैकी पो.नि.बन्सोड मॅडम, पो.शि आशिश जांभोळे व पो.षि. शैलेश कडु आणि पंच क्र 1 श्री.जाधव असे शासकीय वाहन क्र एम.एच 27 ए.ए.77 नी माझ्या घराकडे रवाना झालो व घरापासुन काही अंतरावर असलेल्या नदीजवळ थांबलो.त्यानंतर श्री. निंघोट यांचा मला फोन आला व त्यांनी मला म्हटले की, मी 10 मीनीटात येत आहे.त्यावेळी पो.षि.आषिश जांभोळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन 16 जी.बी.चे मेमरीकार्ड टाकुन तो माझ्या गळ्यात लटकवला आणि मी व पंच क्रमांक 1 असे आम्ही दोघे माझ्या घरी पायी चालत गेलो. काही वेळाने पंकज निंघोट माझे घरी आले व आमचे कामासंबंधाने संभाषण झाले व पंकज निंघोट तेथुन निघुन गेले. नंतर मी व पंच असे दोघे नदीजवळ परत आलो.त्यानंतर पो.षि.आशिश जांभोळे यांनी माझे गळ्यातील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला व सर्वांनी रेकॉर्डींग ऐकली त्यावरुन पो.नि.बन्सोड मॅडम व पोलीस स्टाफ आणि पंचाची खात्री झाली की, पंकज निंघोट यांनी मला लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची संमती दर्शविली आहे. त्यामुळे लागलीच सापळा पुर्व कार्यवाही करायची असल्याने परंतु सदरचे ठिकाण हे सुरक्षित नसल्याने पो.नि. बन्सोड मॅडम यांनी आपण सर्व संकट मोचन बाल हनुमान मंदीर बासपानी फाटा धारणी येथे जाण्याचे ठरवुन बाकी उर्वरीत स्टाफ ला सुध्दा संकट मोचन बाल हनुमान मंदीर बासपानी फाटा धारणी येथे बोलाविले. काही वेळानंतर आम्ही सगळे संकट मोचन बाल हनुमान मंदीर बासपानी फाटा धारणी येथे आलो. तेथे पोनि बन्सोड मॅडम यांनी सापळा पुर्व पंचनामा दरम्यान महत्वाच्या सुचना दिल्या. पोलीस अंमलदार प्रमोद रायपुरे यांनी अॅन्थ्रोसिन पावडरचे गुणधर्म सांगुन अल्ट्राव्हॉयलेट लॅम्प बाबत माहीती दिली. सापळा कारवाई दरम्यान श्री. पंकज निंघोट यांना दयायची लाच रक्कम 10,000/- रु मला हजर करण्यास सागितले त्यावरुन मी 500रु दराच्या 20 नोटा हजर केल्या त्यावर पोलीस अंमलदार प्रमोद रायपुरे यांनी अॅन्थ्रोसिन पावडर लावुन माझ्या पॅन्टच्या डाव्या बाजुस असलेल्या खिशात सदर रक्कम ठेवली. त्यानंतर मी पंकज निंघोट यांना कॉल करुन कोठे येवु याबाबत विचारले असता पंकज निंघोट यांनी मी पंचायत समीती धारणी येथे आहे तुम्ही तेथे या श्असे सांतिल्यावरुन मी पंच क्र 1 श्री.जाधव, पोशि आषिश आणि पो.षि.शैलेष व बन्सोड मॅडम असे रवाना होवुन दुस-या वाहनात इतर उर्वरित स्टाफ असे पंचायत समीती धारणी करीता एका मागोमाग रवाना झालोत. पंचायत समीती पासुन काही अंतरावर थांबुन पो.षि.आषिश जांभोळे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन 16 जी.बी.चे मेमरीकार्ड टाकुन तो माझ्या गळ्यात लटकवला ती वेळ अंदाजे 15.45 वा.ची होती त्यांनतर मी आणि पंच क्र 1 जाधव असे पंकज निंघोट यांची भेट घेण्याकरीता त्यांच्या कार्यालयात पायी गेलो. आमच्या मागोमाग उर्वरीत पोलीस स्टाफ गाडी चे खाली उतरुन पंचायत समीती धारणी चे परीसरात आडोसा घेवुन थांबले. मी पंकज निंघोट यांची भेट घेतली व त्यांना त्यांनी मागीतलेली 10,000रु/- लाच रक्कम माझे पॅन्ट चे खिशातुन काढली पंकज निंघोट यांना दिली असता त्यांनी माझेकडुन लाच रक्कम स्विकारली व ती पंचासमक्ष ते बसलेल्या ठिकाणी टेबल च्या ड्रावर मध्ये ठेवली. मी सापळा पथक यांना दिसेल अशा ठिकाणी येवुन नियोजित लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा ( रुमालाने तोंड पुसण्याचा) दिला,त्यावरुन सापळा पथकातील पो.नि.बन्सोड मॅडम व स्टाफ तेथे आला व पो.शि. आषिश जांभोळे यांनी माझ्या गळ्यातील व्हॉईस रेकॉर्डर बंद केला ती वेळ अंदाजे 16.02 वा.ची होती पो.नि. बन्सोड मॅडम व स्टाफ यांनी श्री.पंकज निंघोट ग्रामीण गृहनिमार्ण अभियंता यांना आपला परीचय देवुन त्यांना ताब्यात घेतले. एकंदरीत नमूद इलोकसेवक पंकज निंघोट यांनी पडताळणी कारवाई दरम्यान पंचासमक्ष मला माझे घरकुल बांधकामाच्या 3 -या हप्त्याची रक्कम माझे बॅंक खात्यात जमा करण्यापुर्वी 10,000/- रुपये व पैसे जमा झाल्यानंतर 5,000/- रुपये दयावे लागतील अषी एकुण 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्यान घरकुल बांधकामाच्या 3 -या हप्त्याची रक्कम माझे बॅंक खात्यात जमा करण्यापुर्वी 10,000/- रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष माझेकडुन स्विकारल्यावरुन नमूद इलोकसेवक पंकज निंघोट यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांनतर पो.नि.सुजाता बन्सोड यांनी इलोकसेवक यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव श्री.पंकज रमेशराव निंघोट, वय 30 वर्षे, पद - ग्रामिण गृहनिर्माण अभियंता (आर एच ई) पंचायत समिती धारणी, ता. धारणी जि.अमरावती .रा. धनई नगर, सुरेश धुर्वे यांचे घरी किरायाने, धारणी, ता. धारणी, जि.-अमरावती मुळ पत्ता रा. शेंदोडा खुर्द, ता. तिवसा, जि. अमरावती (कंत्राटी) असे सांगितले त्यांचेकडुन लाच रक्कम खात्री करुन पंचामार्फत ताब्यात घेण्यात आली.सदरवेळी मोबाईलव्दारे चित्रीकरण करण्यात आले.केलेल्या संपुर्ण कारवाईचा सविस्तर पंचनामा करण्यात आला. एकंदरीत दिनांक 10/07/2025 रोजी आयोजित पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान इलोकसेवक श्री.पंकज रमेशराव निंघोट, वय 30 वर्षे, पद - ग्रामिण गृहनिर्माण अभियंता (आर एच ई) पंचायत समिती धारणी, ता. धारणी जि.अमरावती रा. धनई नगर, सुरेश धुर्वे यांचे घरी किरायाने, धारणी, ता. धारणी, जि. अमरावती मुळ पत्ता रा. शेंदोडा खुर्द, ता. तिवसा, जि. अमरावती (कंत्राटी) यांनी मला माझे घरकुल बांधकामाच्या 3 Úया हप्त्याची रक्कम माझे बॅंक खात्यात जमा करण्यापुर्वी 10,000/- रुपये व पैसे जमा झाल्यानंतर 5,000/- रुपये दयावे लागतील अशी एकुण 15,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच

पोलीस स्टेशन, धारणी / सत्यमेव जयते / अमरावती (ग्रा.)

स्विकारण्याचे मान्य केले व सापळा कार्यवाही दरम्यान घरकुल बांधकामाच्या 3 Úया हप्त्याची रक्कम माझे बँक खात्यात जमा करण्यापुर्वी 10,000/- रुपयाची लाच रक्कम पंचासमक्ष स्वीकारल्याने त्यांना रंगेहात पकडण्यात आले. करीता श्री.पंकज रमेशराव निंघोट, वय 30 वर्षे, पद - ग्रामिण गृहनिर्माण अभियंता (आर एच ई) पंचायत समिती धारणी, ता. धारणी जि.अमरावती रा. धनई नगर, सुरेश धुर्वे यांचे घरी किरायाने, धारणी, ता. धारणी, जि. अमरावती मुळ पत्ता रा. शेंदोडा खुर्द, ता. तिवसा, जि. अमरावती (कंत्राटी) यांचे विरुदध कायदेशीर कार्यवाहीस्तव फिर्याद देत आहे. अशा लेखी फिर्याद वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन पुढील तपास कामी पो नि सुजाता बन्सोड ला.प्र.वि.अमरावती यांचे कडे देण्यात आला.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

avtarshing thakurshing chavhan(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

HC 1048 11/7/25

स्टेशन डायरी अंमलदार
पोलीस स्टेशन,धारणी
जि. अमरावती (ग्रामीण)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

मला F.I.R. ची प्रत मिळाली
11-07/25